**ठळक बातम्या**

- आषाढी एकादशीनिमीत्त राज्यात भक्तिमय वातावरण / पंढरपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न, राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती देण्याचं विठ्ठलचरणी साकडं

- आपण ज्ञानेश्वर, शिवराय, सावित्रीमाई आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक वारश्याचे वाहक असल्याचं मुख्यमंत्र्यांच प्रतिपादन

- नाशिक इथं आयोजित ७ व्या चाईल्ड कप तलवारबाजी स्पर्धेत मुलांच्या सेबर प्रकारात महाराष्ट्राच्या श्रीराज पोळनं पटकावलं सुवर्ण पदक

**आणि**

- इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताला विजयासह मालिकेत बरोबरी साधण्याची संधी, आकाशदीपची भेदक गोलंदाजी

**<><><><><>**

पांडुरंगाने राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गानं चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी आशीर्वाद द्यावा, असं साकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विठ्ठलाला घातलं. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आज पहाटे मानाच्या वारकरी दांपत्यासह फडनवीस यांनी सपत्निक, विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीनं मुख्यमंत्र्यांचा सत्कार केला. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि इतर यावेळी उपस्थित होते. सर्व विठ्ठलभक्तांनी वारीच्या माध्यमातून पर्यावरणसंवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**- होल्ड बाईट - मुख्यमंत्री -**

शासकीय महापूजेच्या मानाच्या वारकरी दांपत्याचा सन्मान, तसंच स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा श्रीविठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कारानं सन्मानही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झाला.

**<><><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरात विविध विठ्ठल मंदिरांमध्ये भक्तांचा महासागर लोटला आहे. सर्वत्र जय हरी विठ्ठल आणि पांडुरंग हरीचा जयघोष आणि टाळ-मृदंगाच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमून गेल्याचं वातावरण आहे. **मुंबईत** वडाळ्याच्या प्रती पंढरपूर असलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक विठुरायाची पूजा केली. यावेळी शिंदे यांनी मंदिराच्या विकास आणि सुशोभीकरणासाठी मंजूर केलेल्या २५ कोटी रुपयांच्या कामांना लवकरच सुरुवात होईल, असं सांगितलं. **धुळे** जिल्ह्यात भाविकांनी शालेय विद्यार्थ्यांसोबत पारंपारिक वेशभूषेत दिंडी काढून आषाढी एकादशी साजरी केली. **नाशिक** मधील विठ्ठल मंदिरांमध्ये मोठी गर्दी दिसून येत आहे. विहितगाव इथलं प्रति पंढरपूर तसंच जुनं नाशिक भागातल्या काजीपुरा, कापड पेठ आणि इथर प्रसिद्ध विठ्ठल मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांच्या लांब रांगा लागल्या आहेत. **अहिल्यानगरात** संगमनेर इथल्या विठ्ठल मंदिरात काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्गीय समितीचे सदस्य माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि त्यांच्या पत्नी कांचन थोरात यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची पूजा झाली. पारनेर तालुक्यात पळशीमधल्या प्राचीन वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेल्या पुरातन विठ्ठल मंदिरात, दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. गावातून विठ्ठल रुक्मिणीची दिंडीही काढली गेली.

**शिर्डीतल्या** श्री साईबाबा संस्थानाच्या वतीनंही आषाढी एकादशी निमित्त भाविकांसाठी साबुदाणा खिचडीच्या महाप्रसादाचं आयोजन केलं गेलं.

**बीडमध्ये** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बालरंगभूमी परिषद आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालयातल्या संगीत विभागानं संयुक्तपणे अभंगवाणी या भक्तिसंगीत गायन कार्यक्रम आणि दिंडीचं आयोजन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना आषाढी एकादशीनिमित्त शुभेच्छा दिल्या. विठूमाऊली आपल्या समाजाला आनंदाची आणि समृद्धीची वाट दाखवेल, अशी भावना त्यांनी समजामाध्यमावरच्या पोस्टद्वारे व्यक्त केली.

**<><><><><>**

अशूरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागात पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्य आणि न्यायासाठी करबाला इथं दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्तानं या बलिदानाचं स्मरण करून, यातून लोकांना बिकट परिस्थितीत सत्याच्या बाजूनं उभं राहण्याची प्रेरणा मिळत असल्याचं प्रतिपादन त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे केलं आहे.

**<><><><><>**

आपण ज्ञानेश्वरांचे, शिवरायांचे, क्रांतीज्योती सावित्रीबाईंचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थेट वंशज नसलो, तरी विचारांच्या वारश्याचे वाहक आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. त्यांनी आजपासून ‘महाराष्ट्रधर्म’ विशेष पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ केला. त्यात ते बोलत होते. या सर्वांनी आपल्या ज्ञानानं, त्यागानं आणि धैर्यानं हे राज्य घडवलं. त्याला जपणं, वाढवणं, आणि पुढं नेणं हे आपलं कर्तव्य आहे, असं ते म्हणाले. महाराष्ट्रधर्म म्हणजे स्मरणरंजन नाही. आपण कोण आहोत, हे समजून घेऊन, आपल्याला काय घडवायचं आहे, ते ठरवणं, हाच महाराष्ट्रधर्म आहे,’ असं सांगत या पहिल्याच पॉडकास्टमध्ये मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राची पायाभरणी आणि उभारणीच्या अनुषंगानं

मांडणी केली. 'महाराष्ट्रधर्म हा धर्म नाही. ती एक जीवंत मूल्य संहिता आहे, ती सांगते, विवेकाने विचार करा, सेवाभावानं वागा, आणि शौर्यानं उभे राहा. ज्ञानेश्वरांच्या ओव्यापासून शिवरायांच्या तलवारीपर्यंत, फुल्यांच्या साहसापासून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनापर्यंत ही साखळी कधी तुटलीच नाही. ती सतत पुढं सरकत राहीली,' असं फडनवीस म्हणाले.

<><><><><>

नाशिक इथं आयोजित ७ व्या चाईल्ड कप तलवारबाजी स्पर्धेत मुलांच्या सेबर प्रकारात महाराष्ट्राच्या श्रीराज पोळ यानं आज सुवर्णपदक पटकावलं. अंतिम लढतीत त्यानं तामिळनाडूच्या ए. एस. जोसेफ याचा ११-८ असा पराभव केला. याच प्रकारात महाराष्ट्रच्याच अरोह जाधव आणि पंजाबच्या हेयांश गर्ग यांना संयुक्तपणे कांस्य पदक मिळालं. आजच्या पदकं प्राप्त केलेल्या खेळाडूंना या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे असलेले आशियाई तलवारबाजी असोसिएशनचे सरचिटणीस राजीव मेहता, आणि इतर मान्यवरांच्या हस्ते पदकं आणि प्रमाणपत्रं प्रदान करून सन्मानित करण्यात आले. विविध राज्यांचे ३९० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यावर भारताची मजबूत पकड कायम आहे. आज सामन्याच्या अखेरच्या दिवशी, पावसामुळे खेळ उशीरा सुरू झाला. मात्र भारताच्या आकाशदीप यानं ओली पोप आणि हॅरी ब्रुक यांना झटपट माघारी धाडलं. आत्तापर्यंत इंग्लंडचा निम्मा संघ तंबूत परतला असून, भारत विजयापासून केवळ ५ गडी दूर आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा, इंग्लंडच्या दुसऱ्या डावात ६ बाद १५३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनाचा यशस्वी दौरा संपवून आज ब्राझीलची राजधानी रिओ दी जानेरो इथं पोहोचले. ते ब्राझीलमधे १७व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. यादरम्यान ते जागतिक शांतता आणि सुरक्षा, प्रशासन सुधारणा, कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर, हवामान कृती, जागतिक आरोग्य, आर्थिक बाबी यासह इतर अनेक महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवर विचारविनिमय करणार आहेत. तसंच अनेक द्विपक्षीय बैठकाही ते घेतील. ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्याशीही प्रधानमंत्री द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर लाभदायक ठरेल, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले. ऊसशेतीसाठी कृत्रिम तंत्रज्ञान या विषयावर नागपूर इथे एग्रोव्हीजन फाऊंडेशनने आयोजित केलेल्या विशेष कार्यशाळेत गडकरी यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य-महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तुरळक ठिकाणी गडगडाटासह पावसाचा अंदाजही व्यक्त केला आहे. त्याचबरोबर कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहायची शक्यताही व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**